# राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, कोंकण खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम १८ (१) अन्वये झालेली तक्रार

## तक्रार क्रमांक : १६२५/२०२१

**तक्रारकर्ता,** श्री.दिनेश बाळाराम पाटील,
ब्लॉक नं. ०८, रुतुजा बिल्डींग, २ रा मजला,
संखे कॉलनी, आर्यन हायस्कूलच्या मागे,
निलकंठ बिल्डींग समोर, पालघर ता.जि.पालघर ४०१४०४.

विरुध्द

विद्यमान जन माहिती अधिकारी तथा आस्थापना (अव्वल कारकून), जिल्हाधिकारी कार्यालय, पालघर जिल्हा मुख्यालय, बोईसर रोड, कोळगांव, ता.जि.पालघर ४०१ ४०४.

तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा आस्थापना (अव्वल कारकून), जिल्हाधिकारी कार्यालय, पालघर जिल्हा मुख्यालय, बोईसर रोड, कोळगांव, ता.जि.पालघर ४०१ ४०४.

**तक्रार सुनावणीचा दिनांक : ९/१०/२०२५**

| माहितीचा अर्ज दाखल केल्याचा दिनांक | जन माहिती अधिकारी यांच्या उत्तराचा दिनांक | प्रथम अपिल अर्ज प्राप्त दिनांक | प्रथम अपिल आदेश प्राप्त दिनांक |
|---|---|---|---|
| २४/६/२०१९ | ---- | २०/८/२०२१ | २२/९/२०२१ |

तक्रारकर्ता यांनी दि.२१/१०/२०२१ रोजीच्या अर्जान्वये " माहिती दिली नाही " असे कारण नमूद करुन कलम १८(१) अन्वये तक्रार अर्ज दाखल केला आहे. सदर तक्रार अर्जावर आज दिनांक ९/१०/२०२५ रोजी सुनावणी घेण्यात आली.

सदर सुनावणीस उभयपक्ष अनुपस्थित आहेत. (कार्यालयाद्वारे नोटीस पाठविलेबाबतचे ट्रॅकिंग रिपोर्ट सादर करण्यात आले असून, ते नस्तीसोबत अभिलेखावर ठेवण्यात आलेले आहेत)

तक्रारकर्ता यांनी मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांचेकडे खालीलप्राणे माहिती मागितली आहे.

" *अर्जदार यांचे ठाणे जिल्हयामध्ये समायोजन करणेबाबत आपले कार्यालयाकडे जिल्हाधिकारी ठाणे, उपविभागीय अधिकारी वसई तहसिलदार वसई कार्यालयात केलेले अर्ज/विकल्पावर आपल्या कार्यालयाकडून करण्यात आलेल्या कार्यवाहीच्या संपूर्ण संचिकेच्या साक्षांकित प्रती मिळणेबाबत व इतर माहिती* "

तद्नंतर तक्रारकर्ता यांनी प्रथम अपिलीय प्राधिकारी यांचेकडे कलम १९ (१) अन्वये प्रथम अपील दाखल केले.

तक्रारकर्ता यांनी दाखल केलेल्या प्रथम अपीलावर तत्कालीन प्रथम अपीलीय प्राधिकारी यांनी सुनावणी घेऊन दि.२२/९/२०२१ रोजी, "*अपिलार्थी यांना आस्थापना संकलनात उपलब्ध संचिका उपलब्ध करून देण्यात येऊन त्यांना आवश्यक असलेली माहिती विनामूल्य उपलब्ध करून देण्यात यावी. जन माहिती अधिकारी उपविभागीय अधिकारी वसई विभाग वसई तसेच जन माहिती अधिकारी तहसिल कार्यालय वसई यांनी अपिलार्थी यांना त्यांच्या कार्यालयातील संबंधित प्रकरणाची संचीका उपलब्ध करून द्यावी व अपिलार्थी यांना आवश्यक असलेली माहिती विनामुल्य उपलब्ध करून यावी.*" असा निर्णय दिलेला आहे.

तक्रारकर्ता व जन माहिती अधिकारी यांना सुनावणी सूचना प्राप्त झाल्याचे पोस्ट ट्रॅकिंग रिपोर्टवरून दिसून येत नाही. त्यांना पुन्हा सुनावणीची सूचना काढण्यात यावी.

यास्तव आयोग पुढील आदेश देत आहे.

**आदेश**

१. आयोग कार्यालयाने तक्रारकर्ता, जन माहिती अधिकारी यांना पुन्हा सुनावणीची सूचना काढावी.

२. प्रस्तुत प्रकरणाची पुढील सुनावणी दि.१७/११/२०२५ रोजी दुपारी २.०० वाजता होईल.

कोंकण भवन,
बेलापूर, नवी मुंबई : ४०० ६१४.
दिनांक : ९ ऑक्टोबर, २०२५ .

(शेखर चन्ने)
राज्य माहिती आयुक्त,
कोंकण खंडपीठ

Comp-३